स्टॉक मार्केट स्पेशल

सीडीएसएल आणि अमृतवेलची खास लेखमालिका

दस का दम

अर्थसंकल्पाने कोणत्या कंपन्यांना दिला 'हात'?

अमृतवेल मनी प्लस

April 2011 / ₹ : 30/-

www.amrutwelplus.com

सुवर्णकाळ

सोने-चांदीचे दर वाढतच आहेत...

गुंतवणुकीसाठी सोने घ्यावे का?

थेंबे थेंबे सोने साचे!

विकासाची ऊर्जा

आर. एम. मोहिते इंडस्ट्रीजचे **वीज स्वावलंबन**

'विल'ची नवी परिभाषा **कार्यसंस्कृतीचा वारसा**

'विल'ची नवी परिभाषा
कार्यसंस्कृतीचा वारसा

भारतातील शेती आणि शेतकरी यांच्या विकासाला कटिबद्ध होऊन उभ्या आयुष्याच्या मार्गातील अडथळ्यांना पार करीत चालणारे एक व्रतस्थ वारकरी म्हणजेच जैन इरिगेशनचे संस्थापक, ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री भवरलाल जैन. आपल्या पुढच्या पिढीला संपत्तीचा वारसा नव्हे तर कार्यसंस्कृतीचा वारसा आपण सोडला पाहिजे, ही भूमिका त्यांनी जपली आहे. जळगाव महानगरपालिकेतर्फे त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात त्यांनी आपल्या 'विल'ची नवी परिभाषा मांडली. ती 'अमृतवेल मनी प्लस'च्या वाचकांसाठी खास..

◆◆

विनोद रापतवार, जळगाव

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री भवरलाल जैन यांना नुकतेच जळगाव महानगरपालिकेतर्फे 'जळगावरत्न'ने गौरविण्यात आले. हा गौरव केवळ उद्योगपती म्हणून केला नाही, खानदेशाच्या शेवटच्या टोकावर असलेल्या वाकोदसारख्या छोट्याशा गावातील सर्वसामान्य असलेल्या कुटुंबातून त्यांनी जी झेप घेतली, त्या कार्यकर्तृत्वाचा हा गौरव होता. भवरलालजींनी नुकतीच वयाची ७३ वर्षे पूर्ण केली, असंख्य आव्हानांना सामोरे जात त्यांनी आपले औद्योगिक विश्व जगाच्या कानाकोपऱ्यात नेऊन पोहोचविले आहे. निसर्ग, पाणी, पर्यावरण आणि शेतकरी यांच्या विकासासाठी उभे आयुष्य खर्ची घालणारे हे व्यक्तिमत्त्व या देशातील शेतकरी मोठा झाला तरच कंपनीला मोठे होता येईल. आपले कार्य केवळ उद्योगपती म्हणून न वाढवता सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत त्यांनी शेतकऱ्यांशी बांधिलकी कायम जपली आहे. सर्वसामान्य कुटुंबातून कंपनीचा वाढलेला विस्तार व त्या अनुषंगाने येणारे आर्थिक स्वरूप लक्षात घेता उद्योगपतींनी जीवनाकडे कोणत्या दृष्टीने बघितले पाहिजे याचा आदर्श वस्तुपाठही त्यांनी आपल्या कार्यसंस्कृतीतून निर्माण केला आहे.

उद्योगपती म्हणजे केवळ पैसा, असे एक समीकरण सध्या समाजात सर्वत्र अनुभवयास मिळते. सामान्य लोकांच्या मनात याबाबत अनेक शंका-कुशंकाही निर्माण होतात. प्रत्यक्षात मात्र भवरलालजींसारख्या उद्योगपतींचे कार्य प्रत्यक्ष डोळ्याने पाहिल्यास असे कार्य किती महत्त्वाचे आहे, याची साक्ष पटते. प्रत्येकाला असे कार्य जवळून पाहण्याची संधी मिळतेच असे नाही. भवरलालजी एक उद्योगपती जरी असले तरी त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अधिक आहे. भारतातील शेती आणि शेतकरी यांच्या विकासाला कटिबद्ध होऊन उभ्या आयुष्याच्या मार्गातील अडथळ्यांना पार करीत चालणारे ते एक व्रतस्थ वारकरी असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्या पुढच्या पिढीला संपत्तीचा वारसा नव्हे तर कार्य संस्कृतीचा वारसा आपण सोडला पाहिजे, ही भूमिका त्यांनी जपली आहे. मोठे औद्योगिक घराणे म्हटले की संपत्तीचे व त्या त्या व्यक्तींच्या 'विल'चे महत्त्व अधिक असते. इथे मात्र ते कामाचे, कष्टाचे आणि सामाजिक बांधिलकीचे 'विल' उभे करत आहेत. आयुष्यातील या प्रदीर्घ चिंतनाचा, कष्टाचा संक्षिप्त आढावा त्यांनी या गौरव समारंभात उलगडून दाखविला. त्यांचे हे भावविश्व व दृष्टिकोन या समारंभास उपस्थित असलेल्या डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. जब्बार पटेल यांनीही उलगडून दाखविले.

पद्मश्री डॉ. भवरलाल जैन

गेल्या ७४ वर्षांचा स्तुती घेण्याचा माझा कोटा संपलेला आहे, असे मला वाटतं. गांधीजींनी एकदा म्हटलं होतं की, ''कोणी तुमची स्तुती करत असेल तर तुम्ही कानावर हात ठेवा.'' मी कानावर हात ठेवले नाहीत, कारण ते शिष्टाचाराला धरून झालं नसतं. आपण ज्यांच्या सहवासात वाढतो ते कुटुंब, परिवार, मित्र, सहकारी सर्वांशी प्रामाणिकपणा आपण जपला पाहिजे. कुटुंबातील रक्ताच्या नात्यापलीकडे मित्रांनी मला जपले आहे. मीही त्यांना जपले आहे. ते माझ्या श्वासाचे भागीदार आहेत. कधी मी त्यांच्या श्वासाने बोलतो तर कधी ते माझ्या श्वासाने बोलतात. आपल्या मित्रांना आपल्या सारखे करणे हे मैत्रीचे ध्येय नसते तर ते जसे आहेत तसे त्यांना स्वीकारून त्यांच्यातील अवगुणाचे मूल्यमापन न करणे हाच मैत्रीचा चिरंतन मार्ग आहे. अनेक चांगल्या मित्रांना सांभाळण्याचे भाग्य मला मिळाले हा मी योगायोग समजतो. आपले जीवाभावाचे मित्र भावनेच्या भरात खूप काही बोलत असतात. जर आपण असे नसलो तर तसे व्हा! हे सांगून जातात.

मित्रांनो, जन्म आणि मृत्यू ही मनुष्याच्या हातात असलेली गोष्ट नाही. आपण जिथे ज़न्माला येतो त्याला आपण जन्मभूमी म्हणतो. परंतु या जन्मभूमीचे देणं आपण कधीही फेडू शकत नाही. केवळ जन्मभूमीच नव्हे तर ज्या पूर्वजांनी आपल्यात जे अंश टाकले त्या पूर्वजांनासुद्धा त्याच आदराने पाहिले पाहिजे. आई आणि वडील, वडील-आई असा शब्द नाही, आई-वडील असा शब्द आहे. आई प्रथम आहे. माझी जन्मभूमी वाकोद आहे. कर्मभूमी जळगाव आहे. जन्म वाकोदचा आहे. माझे सबंध आयुष्य जळगावमध्ये काम करण्यात गेले आहे. जळगावमध्ये आजही माझ्यापेक्षा जास्त संपत्ती घेऊन कित्येक लोक आहेत. याच्यापुढेही होतील. जर मी हे गाव सोडले असते तर हे मी आज तुम्हाला अभिमानाने 'मी जळगावचा आहे' असे सांगू शकलो नसतो. जळगाव माझे आहे. मीच नव्हे तर माझी दुसरी पिढीसुद्धा त्यांची पाळंमुळं याच गावात रोवून आहेत. ते इथेच कार्यरत आहेत, येथून वाटेल तेवढा विस्तार ते साध्य करतील परंतु, हेड ऑफिस येथेच ठेवून ते जळगावातच राहणार आहेत हे आज मी आपल्याला अभिमानाने सांगू इच्छितो.

सामाजिक बांधिलकीची जाण मी जी.आर.डी. टाटांकडून शिकलो. जी.आर.डी. टाटांनी स्वत:च्या आणि कंपनीच्या उत्पन्नातील वाटा आवर्जून सामाजिक कामांसाठी खुला केलेला आहे. त्याचे सामाजिक उत्तरदायित्व डोळ्यासमोर ठेवून आम्ही यासाठी खास जनरल बॉडी मिटिंगमध्ये ठरावाद्वारे एकूण उत्पन्नाच्या नफ्यातील ५ टक्के वाटा सामाजिक बांधिलकीसाठी मंजूर करून घेतला आहे. याहीपेक्षा पुढे जात हाच आदर्श माझ्या मुलांनी जपला याचे मला विशेष कौतुक आहे. आपली जेवढी काही कौटुंबिक संपत्ती आहे त्यातील अधिकाधिक वाटा सामाजिक कामासाठी एका ट्रस्टमध्ये सोडण्याचा निर्धार माझ्या मुलांनी माझ्याजवळ व्यक्त केला. त्यांनी पुढे असेही सांगितले, 'भाऊ, आजपर्यंत जेवढे काही झगडे, तंटे होतात त्यांच्यापैकी ९०-९५ टक्के केवळ प्रॉपर्टीसाठी होतात. केवळ मालमत्तेसाठी होतात हे आम्ही बघितलं आहे. तेव्हा हे मूळच तुम्ही काढून टाका. तुम्ही लावलेल्या या वृक्षाचा अधिकाधिक लाभ तुमच्याच हातांनी समाजाला अर्पण करा.' मित्रहो, हे भाग्यसुद्धा फार कमी वडिलांना प्राप्त होते.

समाज ही फार मोठी संज्ञा आहे. समाजाकडून जेवढं माणूस घेत असतो तेवढं तो कधीच परत करू शकत नाही, करू शकणार नाही. मी एक लहानसं उदाहरण देतो. आईनस्टाईनने एक वेळा खूप मोठं संशोधन करून चहाच्या एक पेल्याचे गणित मांडले. आपल्या हातात हा पेला येईपर्यंत त्याला ११८० लोकांचे हात लागलेले असतात. ११८० व्यक्ती ज्यावेळेला झटतात त्यावेळेला तुम्हाला चहाचा एक पेला मिळतो. कोणतेही श्रम कधी समोर येत नसतात, हाच याचा साधा अर्थ. आपल्या सदिच्छेने मी आयुष्यात खूप काही शिकू शकलो. साध्य करू शकलो. यासाठी किती लोकांचे हात लागले असतील! माझी कार्यसंस्कृती मी निर्माण केलेली नाही. वेळेने निर्माण केलेली आहे. या समाजाने ती मला बहाल केलेली आहे. माझ्या सहकाऱ्यांनी ती कार्यान्वित केलेली आहे. मी जर एकटा असलो असतो आणि माझ्या बरोबर माझे सहकारी नसते तर मी हे करू शकलो नसतो. मित्र म्हणा किंवा सहकारी म्हणा. सहकाऱ्याचा अर्थ आम्हाला जो अभिप्रेत आहे तो म्हणजे ज्याला तुम्ही कर्मचारी म्हणतात तो! आम्ही आपल्या सोबत काम करणाऱ्याला कर्मचारी नव्हे तर सहकारीच म्हणतो. सोबत काम

करणाऱ्याला कर्मचारी म्हणणे अत्यंत मोठा गुन्हा आहे, असं मी मानतो. या सगळ्यांनी जर मला मदत केली नसती तर हे शक्य झालं नसतं म्हणून कृतज्ञतेने त्यांचा उल्लेखही करणे गरजेचे आहे.

मध्यंतरीच्या कालावधीत आम्हाला आर्थिकदृष्ट्या खूप वाईट काळ आला. १० वर्षे त्याच्यामध्ये गेली. जीवनातील दहा वर्षे म्हणजे हा कालावधी कमी नव्हे; केवळ आमच्यासाठीच हा कालावधी वाईट गेला असे नव्हे तर माझ्याबरोबर असलेल्या दहा हजार लोकांनाही या दिव्यत्वातून जावे लागले. माझ्या खांद्याला खांदा लावून असणाऱ्या सगळ्या माझ्या सहकाऱ्यांसाठी मला मनातून दु:ख होत होतं. दु:ख पैसे गेले त्याच नव्हतं. त्यांना दिलेले शब्द पाळू शकलो नाही, याचे दु:ख होतं. त्यावेळी मी अत्यंत जबाबदारीने माध्यमांच्या मार्फत तशी समाजाला कबुली दिली होती. 'मला क्षमा करा, परंतु माझ्यावर विश्वास ठेवा. मी परत तुमच्या शब्दाला जागणार आहे.' अगदी स्पष्ट कबुली देऊन समाजाच्या पुढे नागडा झालो. कारण कोणाचा पैसा उडवायचा, हे आपल्या रक्तात नाही, त्यावेळेला माझ्या या पारदर्शी कबुलीला असंख्य प्रतिक्रिया, प्रतिसाद मिळाला. सर्वसाधारणपणे असा प्रतिसाद कॉर्पोरेट जगतामध्ये आजपर्यंत कुणाला मिळाला नाही. अशा स्वरूपाची घटना पूर्वी घडलेली नव्हती. आपण घडवली, याचे कारण स्पष्ट होते ते म्हणजे मन नितळ होते, अशाच नितळ मनाचे आपण सगळे आहात.'

.....

ना. धों. महानोर

भाऊंचं वर्णन किंवा कोणत्याही शेतकऱ्याचं वर्णन करताना एक बाब लक्षात घ्यावी लागेल, ती म्हणजे सगळं जरी जगभर पसरलं तरी त्यांचा पाय हा जळगाव आणि वाकोदमध्येच आहे, याच्यापलीकडे गेलेला नाही याला महत्त्व आहे.

मी माझ्या मुलखात नांदतो
ऐश्वर्याचा राजा,
अरं इथल्या मातीमध्ये रुजवल्या
चैतन्याच्या बागा!

ही जी चांगल्या अर्थाने मस्ती आहे, ती या देशाला, या राज्याला आणि सगळ्या माणसांना असली पाहिजे. या गरीब देशातला हा गरीब कास्तकार, शेतकरी, याला मस्ती करण्याचे काम, बळवंत करण्याचे काम ज्या माणसाने केले, त्या प्रतिभावंत शेतकऱ्याचे भवरलालजी हे म्होरके आहेत.

डॉ. नरेंद्र जाधव

मला स्वत:ला मात्र असं वाटतं की, असंभव गोष्ट जी होती ती त्यांनी संभव केली यात भवरलालजी जैन यांची थोरवी नाही. मला असंही वाटत नाही की त्यांनी केवळ ७ हजार रुपये भांडवलावर सुरू केलेला उद्योग त्याची उलाढाल आता ४,००० हजार कोटींपर्यंत नेऊन ठेवली यातही त्यांची थोरवी नाही. भवरलालजी जैन यांची थोरवी केवळ ही देखील नाही की त्यांनी आपल्या देशामध्ये ११ उद्योग निर्माण केले आणि परदेशामध्ये १३ असे एकूण २४ उद्योग निर्माण करून १० हजार कुटुंबांचे ते पोशिंदे झाले. भवरलालजी यांची थोरवी ही देखील नाही की पीव्हीसी पाईप, ठिबक सिंचन, स्प्रिंक्लर, फळ-प्रक्रिया, अपारंपरिक ऊर्जा अलीकडच्या काळामध्ये या साऱ्या क्षेत्रामधल्या उत्पादनाच्या बाबतीमध्ये जागतिक पातळीवरील ज्यांचा आदरपूर्वक उल्लेख केला जातो, ज्यांची दखल जागतिक पातळीवर घेतली जाते. मला मुद्दाम सांगावंसं वाटतं की, जागतिक बँकेच्या अध्यक्षांशी शेतीच्या विषयांवर चर्चा करताना त्यांच्याकडून जैन इरिगेशनचा उल्लेख झाला नाही असं कधीही होत नाही. परंतु मला वाटतं, भवरलालजींची थोरवी ही सुद्धा नाही. भवरलालजींची थोरवी हीसुद्धा नाही की 'आजची समाजरचना, तिचं स्वरूप आणि पुनर्बांधणी' यासारखे वैचारिक ग्रंथ त्यांनी लिहिले आणि 'ती आणि मी' यासारखं अतिशय आगळवेगळं संवेदनशील पुस्तक असं त्यांनी लिहिलं! मग त्यांची थोरवी नेमकी आहे तरी काय? भवरलालजी जैन यांची थोरवी नेमकी कशामध्ये आहे?

भवरलालजींची जी थोरवी आहे आणि ती मला अगदी मनापासून पटलेली गोष्ट आहे – ती म्हणजे त्यांनी 'विद्येला विनयाची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे. त्यांनी 'साधनेला सातत्याची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे. त्यांनी 'विचारांना आचाराची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे. त्यांनी 'श्रद्धेला बुद्धीची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे. त्यांनी 'सामर्थ्याला संयमाची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे. त्यांनी 'कर्तृत्वाला दातृत्वाची जोड दिली' ही त्यांची थोरवी आहे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'प्रतिष्ठेला त्यांनी सेवेची जोड दिली' ही भवरलालजींची थोरवी आहे.

डॉ. जब्बार पटेल

भाऊंचं नाव घेताना मला असं वाटतं की एक 'संन्यस्त' असं मी म्हणेन. लोकांना असं दिसतं की प्रचंड मोठा उद्योग आहे, या प्रचंड उद्योगातसुद्धा भाऊंच्या मध्ये अतिशय साधा माणूस दडलेला आहे. सहृदय माणूस दडलेला आहे. माणुसकी जपणारा माणूस आहे आणि समोरच्या माणसाला माणूस म्हणून समजणारा माणूस आहे. हे भाऊंचं वैशिष्ट्य मला अगदी साध्या शब्दांत सांगता येईल. शेवटी तळागाळातला शेतकरी जो आहे तो कसा सुखी होईल हे त्यांचं लक्ष आहे. भाऊंनी यावर बोलताना सांगितले की, मला जळगावमध्ये या छोट्या गावात जैन इरिगेशन उभं राहिलेलं आहे आणि ते जगाला काहीतरी उदाहरण दाखवेल. अशी एक प्रचंड महत्त्वाकांक्षा ठेवून आपण जळगावला राहूनच काम करायचे. जागतिक पातळीवर 'बोल्डनेस इन बिझनेस' नावाचा पुरस्कार दिला जातो. आपल्याला आनंद वाटला पाहिजे. गर्वाने आपली मान उंचावली पाहिजे की, जैन इरिगेशनला हे या वर्षाचं ॲवॉर्ड मिळाले आणि ते सुद्धा एन्व्हॉर्नमेंटसाठी. छोट्या आडवळणाच्या जळगाव नावाच्या गावामध्ये अतिशय सिन्सिअरली आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या जैन उद्योगाला हा पुरस्कार मिळणे अभिमानाची गोष्ट आहे. पण दुर्दैव असं असतं, या एन्व्हार्नमेंटकरिता आपण टीव्हीवर नेहमी पाहतो. एन.ओ.सी. देत असताना मंत्री सारखे लबाडपणा करतात. त्या शासकीय यंत्रणेकडून साधं अभिनंदनाचे सौजन्यसुद्धा बाळगता आलं नाही.

एकनाथ खडसे

भाऊंचं लहानपणापासून ते आतापर्यंतचं जे जीवन चरित्र आहे ते बोलण्यासारखे नाही तर शब्दांच्या पलीकडचं आहे. इंडस्ट्रीज म्हणून ते मोठे झाले असतील; पण खरी ती क्रांती आहे ती ठिबकच्या माध्यमातून झाली, जी क्रांती झाली ती स्प्रिंकलरच्या माध्यमातून. मी एक हाडाचा शेतकरी आहे. अनेक वर्ष ही शेती केली. नांगरणं, वखरणं वगैरे. बरेच जण मला विचारतात, अरे नाथाभाऊ इतना पैसा कहासे आया? तर मी त्यावेळेस उत्तर देतो मै ठिबक सिंचन से लाया आणि हे खरं आहे. जेव्हापासून मी ठिबकचा वापर केला तेव्हापासून उत्पन्नामध्ये एकापटीने, दोनपटीने, पाचपटींनी माझी वाढ झाली. एकाच्या जीवनामध्ये तुम्ही क्रांती आणली नाही, तर भाऊ तर अनेक शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये तुम्ही क्रांती आणली. हा शेतकरी या ठिबकचे आणि स्प्रिंकलरचे ऋण कधीही विसरू शकणार नाही.